साप्ताहिक


# सहकारनामा

संपादक - श्री.अब्बास इसाक शेख

●Regd.No.MAHMAR49983 ●Declaration No.SDM/SR/01.2020, Dt.21/10/2020

मोबा.९०९६७७७७५०

Email :saharnamanews@gmail.com



वर्ष-१ ले | अंक - २ रा | सोमवार दिनांक १६ नोव्हेंबर २०२० ते २२ नोव्हेंबर २०२० दौंड (पुणे) | पाने - ४ | किंमत १ रु.


## दौंडमध्ये वाळू माफियांवर पोलीस निरीक्षक नारायण पवार यांची मोठी कारवाई, १ कोटी २० लाखाचा मुद्देमाल नष्ट




भीमा नदीपात्रात उतरुन धडक कारवाई करताना पो.नि.नारायण पवार पोलिस पथकासह

दौंड (सहकारनामा प्रतिनिधी):दौंड तालुक्यातील मौजे देउळगाव राजे, वडगाव दरेकर, पेडगाव या भागात भिमा नदिचे पात्रात मोठया प्रमाणावर वाळु उपसा केला जात आहे अशी बातमी दौंड पोलिसांना मिळाली होती.

यावेळी दौंडचे पोलीस निरीक्षक नारायण पवार, पो.हवालदार असिम शेख, पाडुरंग थोरात, पो.नाईक आण्णासाहेब देशमुख, पो. कॉस्टेबल अमोल गवळी, किरण राउत, अमोल देवकाते, रवी काळे, किशोर वाघ,

पान २ वर पुढे....

## पशुवैद्यकीय सेवा देणाऱ्या डॉक्टरांचा कोव्हीड योद्धा म्हणून सन्मान



पशुवैद्यकीय सेवा देणाऱ्या डॉक्टरांचा कोव्हीड योद्धा म्हणून सन्मान करताना आमदार राहुल कुल

दौंड(सहकारनामा प्रतिनिधी):दौंड तालुक्याचे आमदार राहुल कुल यांच्या हस्ते तालुक्यातील खाजगी पशुवैद्यकीय सेवा देणाऱ्या डॉक्टरांचा कोव्हीड योध्दा म्हणून सन्मान करण्यात आला. हा कार्यक्रम दौंड तालुका भाजपा, पोलीस फ्रेन्ड्स वेल्फेअर असो. महाराष्ट्र राज्य यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आला होता. यावेळी आमदार राहुल कुल यांनी बोलताना संचारबंदीच्या काळात सर्व पशुवैद्यकीय डॉक्टर बंधू, भगिनींनी शेतकऱ्यांचा मुख्य आधार असलेल्या पशुधानाची काळजी घेण्यासाठी तत्परतेने सेवा दिली, अडचणीच्या काळात देखील मोठा आधार दिला. त्यामुळे त्यांनी केलेली सेवा आणि सहकार्य नक्कीच

पान २ वर पुढे...

## सोमवार पासून सर्व मंदिर, मस्जिद, दर्गा दर्शनासाठी खुल्या





पुणे(सहकारनामा): कोरोनाच्या प्रादुर्भावा मुळे तब्बल आठ महिन्यांनंतर आज दि.१६ नोव्हेंबर पासून राज्यातील सर्व मंदिर, मस्जिद, दर्गा ही धार्मिक स्थळे दर्शनासाठी खुली झाली आहेत.

धामिकस्थळे खुली झाल्याने राज्यातील भाविक भक्तामध्ये आनंदाचे वातावरण पाहायला मिळत आहे. सोमवारी बहुतांश मंदिरे, मशिदी, दर्गा पहाटेपासून खुली करण्यात आली. मात्र धार्मिक स्थळे जरी खुली करण्यात आली असली तरी कोरोनाचे नियम पाळूनच सर्व भाविकांना प्रार्थनास्थळां मध्ये प्रवेश दिला जात आहे. ऐन दिवाळीच्या मुहूर्तावर राज्यातील आघाडी सरकारने भाविक, भक्तांना दिवाळीची भेट दिल्याने राज्यात आनंद व्यक्त होत आहे. भाजपनेही याबाबत आपली मागणी लावून धरली होती.

कोरोनाने आपले जाळे पसरल्या नातर राज्यात लॉकडाउन लागू झाला त्यामुळे राज्यातील धार्मिक स्थळे मार्च महिन्यापासूनच बंद करण्यात आली

पान २ वर पुढे...




# संपादकिय

## सोशल मीडियावर स्वतःचे फोटो अपलोड करत असाल तर सावध व्हा..

आज आपल्याकडे लहान मोठ्यांचा जास्त वेळ हा इंटरनेटवर घालवला जात आहे. मात्र, आता सायबर गुन्हे इतके वाढत आहेत की आपल्या सर्वांसाठी ही एक फार मोठी समस्या बनून राहिली आहे. सध्या नवीन ट्रेंड नुसार प्रत्येकजण आपले फोटो इंटरनेटवर ठेवत आहे. यात महिलाही मागे नसून त्याही पुरुषांच्या बरोबरीने किंबहुना त्या पेक्षाही जास्त प्रमाणावर आपले फोटो पोस्ट करतात. हे सर्व फोटो सोशल मिडियावर पोस्ट केले जातात आणि ते कुणालाही सहजपणे डाउनलोड करता येतात. त्यामळे सायबर गुन्हेगार या फोटोंचा दुरुपयोग करताना पाहायला मिळतात. सोशल मिडियावर आलेले हे फोटो तंत्रज्ञानाच्या मदतीने सहजपणे अश्लील छायाचित्रा मध्ये रूपांतरित केले जाऊन मोठे मानसिक संकट उभे राहते. याबाबत नेटवर बनावट खात्याचा मागोवा घेणाऱ्या एका कंपनीला अलीकडेच सोशल मिडियावर पोस्ट केलेल्या एक लाख महिलांच्या छायाचित्रांचे अश्लील प्रतिमांमध्ये रुपांतर झाल्याचे त्यांच्या संशोधनातून पुढे आले आहे.

इंटरनेटवर असे फोटो अपलोड झाल्यानंतर त्या फोटोंवर काम करणारे माफिया सक्रियच असतात. ते महिलांचे फोटो, व्हिडीओ विविध सॉफ्टवेरच्या मदतीने अश्लील प्रतिमांमध्ये रूपांतरित करून ते विविध वेबसाईट आणि अश्लील वेब साईटवर लोड करतात. ते लोक हे काम इतक्या बारकाईने करतात की फोटो आणि व्हिडीओ हा खरा आहे की बनावट हेही ओळखणे कठीण होते. सोशल मिडियावरून अपलोड करून ते अश्लील बनविल्याची सुमारे लाखोंच्या घरात प्रकरणे आहेत. आणि सर्वात धोकादायक गोष्ट म्हणजे अश्लील प्रतिमांमध्ये रूपांतरित झालेल्या एक लाख महिलांचे फोटो इंटरनेटवरून काढणे इतके सहज शक्यही नाही. कारण एकदा का कोणतीही आक्षेपार्ह फोटो, व्हिडिओ इंटरनेटवर अपलोड झाले की ते पूर्णपणे काढून टाकणे जवळजवळ अशक्य गोष्ट होऊन बसते. यावर आयटी ॲक्ट द्वारे नोटीसद्वारे ही आक्षेपार्ह सामग्री काढून टाकण्यासाठी नोटीस दिली जाऊ शकते. तसेच कायद्याचे अनुसरण करणाऱ्या वेबसाइट्स आणि सोशल मीडिया प्लॅटफार्म हे आक्षेपार्ह सामग्री काही प्रमाणात हटवू शकतात, मात्र इंटरनेटवर कोट्यावधी वेबसाइट्स आहेत ज्यामधून अश्लील आणि आक्षेपार्ह सामग्री काढणे शक्य होत नाही. या लाखो वेबसाइट्सवर अंकुश ठेवण्यात सायबर क्राईम, पोलिसांचाही नाईलाज होतो.

सोशल मीडियावर बरीचशी छायाचित्रे, सेल्फी आहेत. त्या सेल्फीमध्ये चेहरा स्पष्टपणे दिसतो आणि सामान्यत: त्याची गुणवत्ता देखील चांगली असते. त्यामुळे अश्लील फोटोसह सेल्फी कॅमऱ्याने घेतलेल्या महिलेच्या चेहऱ्याचे चित्र जोडणे सायबर गुन्हेगारांना सोपे होते. म्हणूनच सायबर गुन्हेगार जास्त करून सेल्फीच्या फोटोंचा जास्त गैरवापर करतात.

ज्या चित्रामध्ये संपूर्ण शरीराचा फोटो दिसतो, त्यापासून चेहरा विभक्त करणे सोपे नसते आणि त्यांना सहजपणे ते हाताळणे शक्य नाही. त्यामुळे सेल्फी काढून ते सोशल मिडियावर लोड करत असाल तर आता सावध होण्याची वेळ आली आहे. हे सायबर गुन्हेगार केवळ महिलांना बदनाम करण्याचा प्रयत्न करत नाहीत, तर तर बडे नेते, सेलिब्रिटी आणि सामान्य पुरुषही त्यांचे टार्गेट होत असतात. त्यामुळे एक साधा पोस्ट झालेला फोटो हा मोठी अडचण निर्माण करू शकतो आणि त्याचे आक्षेपार्ह व्हिडिओ बनवून कोणाचेही जीवन उध्वस्त होऊ शकते. त्यामुळे इंटरनेटवरील जग वाटते तितके सुरक्षित नाहीच त्यामुळे त्यावर आपले फोटो अपलोड करताना नक्कीच विचार करा अन्यथा परिणाम खूपच त्रासदायक आहे.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक अब्बास इसाक शेख यांनी प्रिती प्रिंटर्स, हरिनिर्मल कॉम्प्लेक्स, हरिकृपानगर, मार्केट यार्ड समोर, इंदापूर रोड, बारामती, ता.बारामती, जि.पुणे (महाराष्ट्र) या ठिकाणी छापून केडगाव मस्जीद जवळ, केडगाव, ता.दौंड, जि.पुणे (महाराष्ट्र)-४१२२०३ येथून प्रसिध्द केले.

या अंकात प्रसिध्द झालेल्या लेखातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.

# अविश्री बाल सदनामध्ये दिवाळी, बालदिन साजरा



सेवा संस्था व योग वेदांत सेवा समितीने अविश्री बाल सदनातील विद्यार्थ्यांबरोबर दिवाळी व बालदिन साजरा केला

दौंड(सहकारनामा प्रतिनिधी): आपल्या घरातील मुलांप्रमाणेच बाल सदनातील मुलांची सुध्दा दिवाळी गोड व आनंदात साजरी व्हावी या उद्देशाने येथील वाहेगुरू सेवा संस्था व योग वेदांत सेवा समितीने कुरकुंभ(ता.दौंड) येथील अविश्री बाल सदनातील विद्यार्थ्यांबरोबर दिवाळी व बालदिन उत्साहात साजरा केला. यावेळी विद्यार्थ्यांना मिठाई व फराळाचे वाटप करण्यात आले, तसेच या मुलांबरोबर समितीच्या सदस्यांनी फटाके उडवीत त्यांचा आनंद द्विगुणित केला. त्याच प्रमाणे बालदिनाचे औचित्य साधित, बाल सदनातील विद्यार्थ्यांची ऑनलाइन शिक्षणाची सोय व्हावी, मुले शिक्षणा पासून वंचित राहू नये म्हणून वाहेगुरू सेवा संस्थेच्यावतीने त्यांना स्मार्ट टीव्ही भेट देण्यात आला. दिवाळीत आपल्याला मिळालेली अनमोल भेट पाहून विद्यार्थ्यांच्या चेहऱ्या वरचा आनंद ओसंडून वाहत होता. या प्रसंगी बाल सदनाचे प्रमुख अनिल कटारिया तसेच वाहेगुरू संस्थेचे सदस्य उपस्थित होते.

पान १ वरुन पुढे....

## दौंडमध्ये वाळू माफियांवर पोलीस निरीक्षक नारायण पवार....

चालक पो.नाईक, शैलेश रणसिंग, तसेच ६ होमगार्ड असे पथक तयार करण्यात आले व करून रात्री ११:०० वा. पासुन सदरचे गावामध्ये जावुन पाहणी केली असता काही इसम हे फायबर व सेक्शन बोटीचे सहायाने वाळु उपसा करीत असताना त्यांना दिसुन आले.

पोलिसांनी रात्रीच्या वेळी स्थानिक गावतील एक छोटी बोट मदतीला घेवुन नदी पात्रात जावुन कारवाई करीत असताना वाळु माफियांना पोलीस आल्याची चाहुल लागताच ते बोटी घेवुन पळुन जावु लागले या वेळी पोलीस निरीक्षक नारायण पवार यानी तत्परता दाखवुन एका फायबर बोट मध्ये दोन पोलीस समवेत जावुन बोट ताब्यात घेतली व त्या मोठया फायबर बोटीचे सहायाने इतर सर्व बोटी ज्या दोन ते तीन कि.मी. लांब पाण्यात पाठलाग करून सर्व बोटीमध्ये एकएक पोलीस बसुन ६ फायबर बोटी व ३ सेक्शन बोटी या वडगाव दरेकर हदिदमध्ये आणुन महसुल चे मदतीने जिलेटीनचे सहायाने ब्लास्टींग करून जागीच नष्ट करण्यात आल्या. सदरची कारवाई ही दि.१२ नोव्हे.२०२० रोजी रात्री ११:०० पासुन आज दि.१३ नोव्हे.२०२० रोजी दुपारी १३:०० वाजेपर्यंत चालु होती सदर कारवाईमध्ये १ कोटी २० लाखाचा मुद्देमाल जागीच नष्ट करण्यात आला. ही कारवाई पुणे ग्रामीणचे पोलीस अधीक्षक अभिनव देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच अतिरिक्त पोलीस अधीक्षक मिलिंद मोहीते, व दौंडचे उपविभागीय पोलीस अधीकारी राहुल धस यांच्या मार्गदर्शनाखाली दौंडचे पोलीस निरीक्षक नारायण पवार यांनी केली आहे. या कारवाईमध्ये अनिल पोपट गिरमकर (रा.आर्वी,ता.श्रीगोदा जि.अ. नगर) दादा झुंबर गिरमकर, बबलु पांडुरंग इमते (रा.देउळगाव राजे ता.दौड जि.पुणे) दिपक सुरेश माने (रा.वडगाव दरेकर ता.दौड जि.पुणे) महेश उर्फ पप्पु हनुमंत कोबिरे (रा.नवनाथ नगर ता.श्रीगोदा जि. अहमदनगर) गणेश मोहन शेजळ (रा.वडगाव दरेकर ता.दौड जि.पुणे यांच्या विरूध्द दौंड पोलीस ठाण्यात वाळु चोरीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# दुचाकीस लावलेल्या लावलेल्या बॅगेतून एक लाख लंपास

दौंड (प्रतिनिधी) दौंड शहरातील पेट्रोल पंपावर पाणी पित असताना दुचाकीस लावलेली एक लाख रोकड असलेली बॅग अज्ञात चोरट्याने लंपास केली असल्याची घटना घडली आहे.

या घटनेमुळे खळबळ उडाली आहे. याबाबत पोलिसांनी दिलेली माहिती अशी की, दौंड शहरातील रिलायन्स प्रेट्रोल पंप येथे पेट्रोल भरण्यकरिता तक्रारदार राजेंद्र हरिभाऊ थोरात ( वय ५२) (रा.कौठा. ता. श्रीगोंदा, जि. अहमदनगर)आले होते. तक्रारदार थोरात हे पंपावर असणाऱ्या पिण्याचे पाणी पिण्यासाठी गेले असता त्यांच्या काळ्या रंगाच्या युनिकॉर्न दुचाकीला पिशवी अडकवली होती. त्या पिशविमध्ये एक लाख रुपये रोकड होती. एका अनोळखी व्यक्तीने ती अडकवलेली बॅग पळवून नेली आहे . याबाबत ची तक्रार दौंड पोलीस ठाण्यात राजेंद्र थोरात यांनी दिली असुन दौंड पोलिसांनी अज्ञात व्यक्तीच्या विरोधात गुन्हा दाखल केला असल्याची माहिती ठाणे अंमलदार तन्वीर सय्यद यांनी दिली. दरम्यान , दौंड पोलिसांनी याबाबत पेट्रोल पंपावरील सीसीटिव्ही फुटेज चेक करून त्या अनोळखी व्यक्तीचा शोध सुरू केला आहे. ह्या चोरीच्या घटनेचा व्हिडिओ सर्वत्र सोशल मीडिया वर व्हायरल झाला असून सोशल मिडियात ही याबाबत माहीती देणयाचे आव्हान करण्यात आले आहे.

पान १ वरुन पुढे....

## आजपासूनं सर्व मंदिर.....

होती.

सामवारी पुण्यातील श्रीमंत दगडूशेठ हलवाई मंदिर पहाटे पाच वाजल्यापासून खुलं करण्यात आलं. तर मुंबईची प्रसिध्द दर्गा हाजी अलीही दर्शनासाठी खुले करण्यात आले या दोन्ही धार्मिक स्थळांमध्ये भाविकांची मोठी रांग पाहायला मिळत होती. या सर्व ठिकाणी सोशल डिस्टन्सिंग पाळून दर्शन घेतलं जात आहे, तसेच सोशल डिस्टन्स ठेवतच सर्व भाविकांना दर्शन देण्यात येत आहे.

पान १ वरुन पुढे....

## पशुवैद्यकीय सेवा देणाऱ्या......

वाखाणण्या जोगे आहे असे मत व्यक्त केले. या प्रसंगी डॉ. सुदर्शन खळदकर सदस्य महाराष्ट्र राज्य खाजगी पशुवैद्यकीय सेवा संघ, डॉ. संतोष बडेकर जिल्हाध्यक्ष, डॉ. राहुल चव्हाण तालुका अध्यक्ष, सचिन गुंड अध्यक्ष पोलीस फ्रेंड्स वेल्फेअर असोसिएशनचे दौंड तालुका तसेच भाजपचे गणेश आखाडे, राहूचे सरपंच दिलीप देशमुख सर यांच्यासह परिसरातील खाजगी पशुवैद्यकीय डॉक्टर्स उपस्थित होते.

# भारतीय सम्राट अशोक मोर्य स्मारक कृती समितीच्या वतीने दौंडमध्ये कोविड योद्ध्यांचा सन्मान



कोविड योद्ध्यांचा भारतीय सम्राट अशोक मोर्य स्मारक कृती समितीच्या वतीने प्रशस्तीपत्रक देऊन सन्मान करण्यात आला

दौंड (सहकारनामा प्रतिनिधी): कोरोना महामारीच्या आपतकालीन दिवसांमध्ये फक्त स्वतःच्या आरोग्याचा विचार न करता इतरांचा जीव वाचावा म्हणून आपला जीव धोक्यात घालून ज्यांनी सामाजिक सेवा केली अशा विविध क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी बजावणाऱ्या कोविड योद्ध्यांचा भारतीय सम्राट अशोक मोर्य स्मारक कृती समितीच्या वतीने प्रशस्तीपत्रक देऊन सन्मान करण्यात आला.

शहर व तालुक्यातील सरकारी रुग्णालय, नगरपालिका, आरोग्य विभाग, महावितरण कंपनी, पोलीस स्टेशन, अंगणवाडी सेविका, महसूल विभाग, पत्रकार मित्र, तसेच सामाजिक व राजकीय संघटनेतील ज्यांनी कोरोना काळात उल्लेखनीय कामगिरी बजावली अशांना समितीचे अध्यक्ष मनोज गायकवाड, संजय चितारे, सचिन खरात, रमेश तांबे, शंकर बनसोडे यांच्या हस्ते गौरविण्यात आले. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी अजय ेरात, प्रमोद थोरात, गौतम गायकवाड, श्रीकांत थोरात, अशोक गायकवाड, विजय शिंदे, शेरखान पठाण, कपिल रणदिवे, तसेच सिध्दार्थ नगर येथील भीम सैनिकांचे सहकार्य लाभले.

# लोणीकाळभोर परिसरात मेफोड्रेन ड्रग्स पकडले

लोणीकाळभोर(सहकारनामा प्रतिनिधी): लोणीकाळभोर पोलिस स्टेशन परिसरात आमंली पदार्थ विक्री करणारा इसम स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाकडून जेरबंद करण्यात आला असून त्याच्या कडून ६ ग्रॅम ८५० मिली वजनाचे ५४,८०० रुपये किंमतीचे मेफोड्रोन (ड्रग्स) जप्त करण्यात आले आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार पोलिस अधिक्षक अभिनव देशमुख यांच्या आदेशाने पुणे सोलापूर महामार्गावरील लोणी काळभोर पोलिस स्टेशन परिसरात पेट्रोलिंग करीत असताना गोपनीय बातमीदार मार्फत मिळालेल्या माहिती वरून लोणीकाळभोर टोल नाका परिसरात एक इसम मैफड्रोन (ड्रग्ज) नावाचा अंमली पदार्थ विक्री करण्यासाठी येणार असल्याची खात्रीलायक माहिती मिळाली होती. या माहितीवरून सदर टोल नाक्यावर सापळा रचून एक इसमास ताब्यात घेण्यात आले. जेरबंद करण्यात आलेल्या आरोपीचे नाव किट्टू पुजारी (वय ४७ वर्षे सध्या रा.गंगाधाम कासा, ग्रीन सोसायटी कात्रज पुणे, मूळ रा. राजरामोहन रॉय कामा बाग समोर गिरगाव मुंबई) असे असून त्याची झडती घेतली असता त्याच्या पॅन्टच्या खिश्यात प्लास्टिकच्या पुडी मध्ये मेफड्रोन (ड्रग्ज) नावाचा अंमली पदार् मिळून आला. संबंधित आरोपीवर गुन्हा



स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाकडून जेरबंद करण्यातआलेला आरोपी

दाखल करण्यात आला असून आरोपी व मुद्देमाल पुढील तपास कामी लोणीकळभोर पोलिस स्टेशनच्या ताब्यात दिले आहे.

सदरची कारवाई ही पोलिस अधिक्षक अभिनव देशमख यांच्या मार्गदर्शनाखाली अप्पर पोलिस अधिक्षक विवेक पाटील, उपविभागीय पोलिस अधिकारी हवेली विभाग सई भोरे पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे वरीष्ट पोलिस निरीक्षक पद्माकर घनवट, पोलिस उप.नि.शिवाजी ननावरे, पो.हवा. राजेंद्र पुणेकर, पो.ना.विजय कांचन, पो. कॉ.धिरज जाधव, पो कॉ अक्षय नवले यांनी केली आहे.

निर्भिड बातम्यांचे व्यासपीठ
साप्ताहिक सहकारनामा
आजच अंकाची मागणी करा
मोबा.९०९६७७७७५०

# शिवसेना उपजिल्हाप्रमुख महेश पासलकर यांच्याकडून पत्रकारांचा सन्मान



शिवसेना उपजिल्हाप्रमुख महेश पासलकर सहकारनामाचे संपादक अब्बास शेख यांचा सन्मान करताना

दौंड (सहकारनामा प्रतिनिधी): दौंड तालुक्यातील चौफुला येथ शिवसेना उपजिल्हाप्रमुख महेश पासलकर यांच्या कडून तालुक्यातील विविध मान्यवर पत्रकारांचा कोवीड योध्दा म्हणून सन्मान करण्यात आला.

सहकारनामा' चे संपादक अब्बास शेख यांचाही यावेळी गौरव करण्यात आला.या कार्यक्रमा वेळी सर्व पत्रकार बांधवांना दिवाळी फराळ आणि मिठाई भेट देण्यात आली. यावेळी महेश पासलकर यांनी बोलताना संपूर्ण भारत एकजूट होऊन कोरोना या महामारीशी लढत आहे. अशा कठीण परिस्थितीत आपण पत्रकार मडळी समाज आणि समाजातील लोकांसाठी करीत असलेले सेवाकार्य अतुलनीय आहे.

आपल्या सेवेने सर्वांसमोर मानवतेचे एक नवीन उदाहरण ठेवले आहे. आपल्या धैर्याला आम्ही सलाम करतो असा गुणगौरव आपल्या भाषणातून केला. तालुक्यातील विविध पत्रकारांनी कोरोना काळात केलेल्या अतुलनीय कामगिरी बाबत त्यांना शिवसेना दौंड विधानसभा व शिवसेना उपजिल्हा प्रमुख महेश पासलकर मित्र परिवाराच्या वतीने कोरोना योध्दा म्हणून सन्मानित करण्यात आले.

# केडगावमध्ये प्रसिद्ध वकिलांच्या घरी मोठी चोरी, ४ लाख ९ हजारांचा ऐवज लंपास

दौंड (सहकारनामा प्रतिनिधी): दौंड तालुक्यातील केडगाव–बोरीपार्धी गावच्या हद्दीमध्ये एका नामवंत वकिलांच्या घरी चोरट्यांनी डल्ला मारून सुमारे ४ लाख ९ हजार रुपयांचे दागिने चोरून नेले आहेत. हि घटना दि. ११ नोव्हेंबर २०२० रोजी दुपारी १२:४५ वा ते. दुपारी २:४० वाचे. दरम्यान घडली असून या प्रकरणी ॲड.मानसिंग सर्जेराव शितोळे (वय ६८, व्यवसाय वकील, मुळ रा.देवकरवाडी, ता. दौड, जि.पुणे, सध्या रा. सर्जेराव जेधे इग्लीश मिडीयम स्कुल जवळ, बोरीपार्धी, ता. दौंड, जि. पुणे) यांनी फिर्याद दिली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार सर्जेराव जेधे इग्लीश मिडीयम स्कुल जवळ चोरट्यांनी शितोळे यांच्या बंद असलेल्या घराच्या दरवाजाचे कुलुप कशाने तरी तोडुन घरामध्ये प्रवेश केला. आत आल्यानंतर त्यांनी घरामध्ये लोखंडी कपाटाच्या लॉकरमध्ये ठेवलेली रोख रक्कम व सोन्याचे दागीने असा एकुण ४ लाख ९ हजार रुपयांचा मुददेमाल चोरी करून पोबारा केला आहे. चोरट्यांनी चोरलेल्या ऐवजामध्ये ८०,००० च्या दोन सोन्याची साखळया, ४०,००० ची एक सोन्याची पिळया पिळयाची अंगठी, ८०,००० च्या दोन सोन्याच्या अंगठया तसेच लॉकरमध्ये प्रत्येकी २०,००० एक सोन्याची पिळया पिळयाची अंगठी, ६०,००० च्या तीन सोन्याच्या अंगठया, ८०,००० च्या दोन जोडी कानातील कर्णफुले, ५,०००/ दोन सोन्याच्या नाकातील नथ, १०,००० चे ५० सोन्याचे जिरे टाईप मनी, एक जोड चांदीच्या पट्टया ६,००० ची चार जोड चांदीची जोडवी व २५,००० रोख रक्कम असा एकुण ४ लाख ९ हजारांचा ऐवज चोरीला गेला आहे. या प्रकरणी यवत पोलीस अधिक तपास करीत आहेत.

# ओबीसी सेवा संघाच्या जिल्हा उपाध्यक्ष पदी नानासाहेब टेंगले यांची निवड

दौंड (सहकारनामा प्रतिनिधी): अखिल भारतीय ओ.बी.सी सेवा संघ महाराष्ट्र राज्यच्या पुणे जिल्हा उपाध्यक्षपदी नानासाहेब टेंगले यांची निवड झाली आहे.

त्यांच्या निवडीचे पत्र त्यांना संघटनेचे संस्थापक अध्यक्ष हनुमंत सुतार यांच्या उपस्थितीमध्ये प्रदेश अध्यक्ष तात्यासाहेब देडे यांच्या हस्ते देण्यात आले. भविष्यात सर्व ओ.बी.सी. समाज आणि तळागाळातील लोकांच्या हिताचे काम करण्यास प्राधान्य राहील तसेच सर्वांना सोबत घेऊन काम करणार असल्याचे यावेळी नानासाहेब टेंगले यांनी सांगितले



केले. बहुजन हिताय, बहुजन सुखाय, या नियमाप्रमाणे आपण वाटचाल करणार असल्याचेही त्यांनी आवर्जून नमूद केले.

# पाटसमधून गावठी पिस्टलसह २ काडतुसे, मोटरसायकल, मोबाईल कारवाईत जप्त



ॱएलसीबी टीम कारवाईनंतर आरोपीसह एलसीबी पथकासह

दौंड (सहकारनाा प्रतिनिधी): आज दि. १३ नोव्हेंबर रोजी पुणे ग्रामीण एलसीबी टिमने पाटस मधून गावठी पिस्टलसह दोन काडतुसे जप्त केली. हि कारवाई पोलीस निरीक्षक पद्माकर घनवट यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली.

मिळालेल्या माहितीनुसार यवत पोलीस स्टेशन हद्दीत असणाऱ्या पाटस उड्डान पुलाच्या शेजारील सर्व्हीस रोडवर आरोपी लक्ष्मण उर्फ लखन दत्तात्रय सपकाळ (वय ३५ रा. कानगाव, वरसगाव वस्ती, ता.दौंड जि.पुणे मूळ रा.वरसगाव गोरडवाडी ता. वेल्हा जि.पुणे) याने विनापरवाना व बेकायदेशीर हेतूने आरोपी दिपक उर्फ मोगल्या पासलकर (रा.कुरण बु. ता.वेल्हा जि.पुणे) याच्याकडून पिस्तुल विकत घेऊन तो स्वत: जवळ बाळगत होता.

एलसीबी टीमने ज्यावेळी त्याची झडती घेतली त्यावेळी त्याकडे एक गावठी पिस्टल व दोन जिवंत काडतुसे तसेच मोटरसायसकल, मोबाईल असा एकुण किंमत रु. १ लाख १८ हजार ६०० रुपयांचा मुद्देमाल मिळून आला. सदर आरोपीस पुढील कारवाईसाठी यवत पो.स्टे. चे ताब्यात देण्यात आले.

सदरची कामगिरी स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री.पद्माकर घनवट सो. यांचे मार्गदर्शनाखाली सहा.पो.निरीक्षक पृथ्वीराज ताटे, पो.हवा. महेश गायकवाड, पो.हवा. निलेश कदम, पोहवा. विदयाधर निचित, पोहवा. सचिन गायकवाड, पो.ना. सुभाष राऊत, पो.ना. गुरु गायकवाड यांनी केलेली आहे.

# भीमा नदी पात्रात अवैध वाळू उपसा करणाऱ्या वाळू माफियांना दौंड पोलिसांचा दणका

## १७ यांत्रिक बोटी उध्वस्त, ११ जणांवर गुन्हा दाखल



९ फायबर व ८ सेक्शन बोटी जिलेटिनच्या साह्याने उध्वस्त करण्यात आल्या

दौंड (सहकारनाजा प्रतिनिधी): दौंड हद्दीतील भीमानदी पात्रांमध्ये राजरोसपणे अवैध वाळू उपसा करणाऱ्या वाळू माफियांना दौंड पोलिसांनी पुन्हा एकदा मोठा दणका दिला आहे. वाळू उपसा करण्यासाठी वापरण्यात येत असलेल्या ९ फायबर व ८ सेक्शन बोटी जिलेटिनच्या साह्याने उध्वस्त करण्यात आल्या असून ११ वाळू माफियांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. दौंड पोलिसांनी केलेल्या कारवाई मध्ये २ कोटी ३६ लाख २५ हजार रुपयांचे नुकसान झाल्याने वाळू माफियांचे कंबरडे मोडले असून त्यांचे धाबे ही दणाणले आहेत.

कोरोना च्या पार्श्वभूमीवर सर्वत्र लॉक डाऊन असल्याने नाईलाजास्तव वाळू माफियांनी सुध्दा आपला अवैध वाळू उपशाचा गोरख धंदा बंद ठेवलेला होता. परंतु सगळीकडेच लॉक डाऊन शिलि झाल्याचे लक्षात येताच वाळू माफियांनी आपले डोके पुन्हा वर काढले, व भीमा नदी पात्रात राजरोसपणे अवैध वाळु उपसा करण्याचा धंदा पुन्हा जामात सुरू केला. याची पक्की खबर दौंडचे उपविभागीय पोलीस अधिकारी राहुल धस यांना मिळताच त्यांनी तत्काळ आपल्या सहकाऱ्यांसमवेत भीमा नदी पात्रात उतरून बेलगाम झालेल्या वाळू माफियांच्या अड्ड्यांवर धाड टाकीत वाळू उपसा करणाऱ्या बोटी पकडून त्या जिलेटिन च्या साह्याने उडवून दिल्या. तसेच भीमा नदी पात्रातील एक जेसीबी मशीन व ३० ब्रास वाळू साठा जप्त केला आहे.

अवैध वाळू उपसा करणाऱ्या नाना गवळी (कानगाव,दौंड) बंडू सातव, हरिभाऊ होलम, बाळू मोरे (रा. शिरापूर, दौंड) विठ्ठल माळवदकर (रा. बाभुळगाव, ता.कर्जत, नगर) दत्ता गायकवाड(रा.जिंती मळा,ता. करमाळा) संदीप काळे (रा. आलेगाव, दौंड), सलमान मुलाणी (रा. भिगवन) संदीप उर्फ सँडी कशमिरे (रा. घंटा चाळ, दौंड) गिरीश मुलचंदानी (रा. दौंड) गोविंद भिसे (रा शिरापूर) तसेच इतर कामगारांन विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुणे जिल्हा ग्रामीण विभागाचे पोलीस अधीक्षक अभिनव देशमुख, अप्पर पोलीस अधीक्षक मिलिंद मोहिते यांच्या मार्गदर्शनाखाली सदरची कारवाई करण्यात आली. उपविभागीय पोलीस अधिकारी कार्यालयातील पोलीस कर्मचारी नंदकुमार केकान, दीपक वाईकर, सुभाष डोईफोडे, धनंजय गाढवे, कमलेश होले, होमगार्ड प्रशांत चितारे, चालक विजय पवार तसेच बारामती RCP पथकातील पोलिस कर्मचाऱ्यांनी कारवाईमध्ये भाग घेतला.

# चिमुकलीच्या मृत्यू प्रकरणी

## बेजबाबदार ठेकेदारावर गुन्हा दाखल

पुणे (सहकारनामा प्रतिनिधी):पुणे जिल्ह्यात असणाऱ्या शिरूर तालुक्या मध्ये कवठे येमाई येथील काळूबाई नगर परिसरात रस्त्याच्या बाजूला असणाऱ्या खड्ड्यात पडून एका दोन वर्षीय चिमुकलीचा मृत्यू झाला होता.

संबंधित ठेकेदाराने अष्टविनायक महामार्गाच्या कामासाठी रस्त्याच्या कडेला मोठा खड्डा खोदून ठेवला होता असा आरोप मुलीच्या पीडित कुटुंबाने केला होता. त्यामुळे या बेजबाबदार ठेकेदारावर गुन्हा दाखल करण्याची मागणी मृत मुलीच्या आईने केली होती.
मिळालेल्या माहितीनुसार काही महिन्यां पूर्वी रस्त्याच्या कडेला जवळपास सात ते आठ खड्डा खांदून ठेवण्यात आला होता. पाणी साचलेल्या या खड्ड्यात नजीकच राहणाऱ्या संतोष रामदास इचके यांची दोन वर्षाची मुलगी खेळताना पडून त्यात तिचा दुर्दैवी मृत्यू झाला. या प्रकारानंतर सनिक नागरिकांनी संतप्त होऊन येथील रस्ता बंद करून संबंधित बेजबाबदार ठेकेदारावर कडक कारवाई करण्याची मागणी केली होती. या घटनेची माहिति शिरूर पोलिसांना मिळताच सहाय्यक पोलीस निरीक्षक बिरुदेव काबुगडे, कॉन्स्टेबल पालवे यांनी घटनास्थळी जाऊन पाहणी केली व त्या पीडित कुटुंबाची भेट घेत घटनेची सविस्तर माहिती घेतली. मिळालेल्या सर्व माहितीनंतर पोलिसांनी संबंधित बेजबाबदार ठेकेदारा विरोधात गुन्हा दाखल केला आहे.

# सर्व धर्मियांची प्रार्थनास्थळे मुख्यमंत्र्यांच्या आदेशानुसार १६ नोव्हेंबर २०२० रोजी खुली





दौंड (सहकारनामा): कोरोना महामारी मळे लॉकडाऊनमध्ये सुमारे ८ महिने बंद असलेली सर्व धर्मियांची प्रार्नास्ळे मुख्यमंत्र्यांच्या आदेशानुसार सोमवार दि.१६ नोव्हेंबर २०२० रोजी खुली करण्यात आली.

या आदेशाला अनुसरूनच श्री सदगुरू नारायण महाराज दत्त संसन बेट (केडगांव) येथील मदिरे सर्व भाविकांसाठी सुरु होणार आहे अशी माहिती संस्थेचे प्रमख विश्वस्त श्री. संजय शितोळे व विश्वस्त मंडळ यांनी दिली.

यावेळी शितोळे यांनी बोलताना मला सर्व भाविकांना कळविण्यात अत्यंत आनंद होत आहे कि, आपण आपली मंदिरे सोमवार दि. १६ नोव्हेंबर २०२० रोजी सर्व भक्तांसाठी सुरु करत असून यावेळी श्री महाराजांना प्रिय असलेली श्री सत्यनारायण पूजा संपन्न करून मंदिर पुन्हा दर्शनासाठी उघडत आहोत.
सर्व भाविकांनी लॉकडाऊन काळात गेले ८ महिने विशेष सहकार्य केले त्याबद्दल सर्व भक्तांचे मनापासून आभार मानतो, तसेच यापुढे देखील सर्व नियमांचे काटेकोरपणे पालन भक्त करतील व व्यवसपनास सहकार्य करतील अशी अपेक्षा आहे असे मत व्यक्त केले.
कोरोनाच्या दुसऱ्या लाटेत भाविकांनी विशेष काळजी घ्यावी, तसेच संस्थेने शासनाने वेळोवेळी कोरोना काळात लॉकडाऊन मधील सर्व नियमांचे काटेकोरपणे पालन केले आहे व यापुढे देखील शासनाने जाहीर केलेल्या नियमांचे आम्ही पालन करू असे आश्वासन यावेळी त्यांनी दिले.

येणाऱ्या भाविकांच्या माहितीसाठी नियमावली फलक मंदिर परिसरात लावलेले आहेत. यावेळी सर्व भाविकांच्या मनात दर्शनाची ओढ आहे परंतु भाविकांनी दर्शनास येताना मास्क व सॉनिटायजरचा वापर करावा, मंदिरात प्रवेश करण्यापूर्वी हात पाय स्वच्छ धुवावे, कोणत्याही प्रकारची फुले, हार, प्रसाद , श्रीफळ आणू नयेत, मंदिरात अनावश्यक गर्दी टाळावी, मंदिरातील कोणत्याही वस्तुला स्पर्श करू नये असे आवाहन त्यांनी केले.